REGISTERED No. B. 3434






# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २६ मे, १९४८ अंक २०


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल : | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर भांडवल : | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल : | रु. २,००,००,००० |

गतवर्षासाठीं बँकेनें शेअरवर पांच टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

—बँकेच्या शाखा—

डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट, गिरगांव व दादर), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे ऑफिस), नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर व कल्याण.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर.

## सारस्वत को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,०६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,२५,००० |
| ठेवी ... | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८७,००,००० |

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा —

सब–ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८"—१०")
संपूर्ण देशी. पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
—चौकशी स्थान—
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**ब्रिटिश कारखान्यांकडून माल मिळण्यास विलंब**—इंग्लंडमध्यें नुकतेंच एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. हें प्रदर्शन पहाण्यासाठीं गेलेले हिंदी प्रेक्षक श्री. के. एन्. मोदी ह्यांनीं अशी तक्रार केली होती कीं ब्रिटिश कारखान्यांच्या मालाच्या नक्की किंमती कळविण्यांत येत नाहींत व माल वेळेवरही मिळत नाहीं. ह्यासंबंधीं इंग्लंडच्या पुरवठा मंत्र्यांनीं असा खुलासा केला कीं ब्रिटिश कारखान्यांकडे मालाच्या मागण्या तुंबून राहिल्या असल्यामुळें असें होत असावें. कांहीं प्रकारच्या इलेक्ट्रिक मोटर्स मोठ्या यंत्रसामुग्रीला आवश्यक असल्यामुळें त्या सुट्या देतां येत नाहींत असाहि खुलासा एका ब्रिटिश कारखान्यातर्फे करण्यांत आला आहे.

**मच्छीमारीच्या धंद्याची प्रगति**—मुंबई सरकारच्या मच्छीमारी खात्यांचा १९४६–४७ सालचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून ह्या धंद्याची संघटना, कोळ्यांना मदत, संशोधन, इत्यादी बाबतींत बरीच प्रगति झाल्याचें दिसून येतें. अहवालाच्या वर्षी मच्छीमारीसाठीं वापरण्यांत येणाऱ्या छोट्या आगबोटींची संख्या १७ वरून २९ पर्यंत आली. कारवारमधील एका सहकारी मच्छीमारी संस्थेनें ४० हजार रुपये खर्चून एक लॉंच विकत घेतली. त्यासाठीं सरकारनें कर्ज व १० हजार रुपयांची मदत केली होती. १९४५–४६ सालीं ह्या बोटींनीं ३०,०४,३४१ पौंड वजनाच्या माशांची ने-आण केली, तर गेल्या वर्षी ३०,३६,४२५ पौंडांची ने–आण केली. बोटींनीं रत्नागिरीहून आंबे आणले व कारवारमधील शेतकऱ्यांचा माल मुंबईच्या बाजारांत नेला. त्यामुळें शेतकऱ्यांच्या मालाला चांगली गिऱ्हाइकी मिळाली.

**तुंगभद्रेवरील धरण**—पूर्वी ठरल्याप्रमाणें तुंगभद्रेवरील धरणाचें काम चालू ठेवलें तर तें काम १९५३ सालीं पुरें होईल असा अंदाज आहे. हें धरण मद्रास व हैद्राबाद ह्यांच्या संयुक्त प्रयत्नानें व्हावयाचें असून त्यामुळें, शेतीसाठीं पाणी व विजेची शक्ती ह्यांचा पुरवठा होईल. मद्रास प्रांतांतील धरणाचा भाग १९५० पर्यंत पुरा होईल. सध्या १० हजार मजूर व २,००० कैदी कालवे खणण्याच्या कामांत गुंतले असून कामाची बरीच प्रगति झाली आहे.

**पेट्रोल वाचविण्यासाठीं सायकलचा उपयोग**—सौराष्ट्राच्या पंतप्रधानांनीं पेट्रोल वाचविण्यासाठीं कचेरीला सायकलवरून जाण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळें इतर लोकही त्यांचें अनुकरण करण्याचा संभव आहे.

**कापडाच्या महागाईची चौकशी करा**—अहमदाबादचे एक गिरणी-मालक श्री. महेंद्र शांतिलाल ह्यांचें कापडाच्या सध्याच्या टंचाईबद्दल मुंबईंत एक व्याख्यान झालें. श्री. शांतिलाल म्हणाले कीं, कापड बाजाराची सध्याची परिस्थिति मुख्यतः गिरणी मालकांनींच निर्माण केली आहे. उत्पादन अगर त्याची वाटणी यशस्वी न होण्याचें कारण गिरणी-मालक स्वतः कमीत कमी १५ टक्के नफा घेतात हें आहे. त्यामुळेंच ठराविक दुर्जाचें कापड काढणें आणि नियंत्रणें रद्द करणें हे दोन्ही प्रयोग अयशस्वी झाले आहेत. एखादा आर्थिक नियम जर सामान्य माणसाच्या हिताला धक्का लावीत असेल तर त्यासंबंधीं चौकशी करणें हें सरकारचें कामच आहे. सध्याच्या परिस्थितींत कापडाच्या महागाईची चौकशी करण्याशिवाय सरकारला दुसरा मार्गच राहिलेला नाहीं.

**हिंदी निर्वासितांचे पाकिस्तानांतील शेअर्स**—पाकिस्तान सरकारनें एक पत्रक काढून कंपनी कायद्याप्रमाणें पाकिस्तानांत कचेरी असलेल्या कंपन्यांकडून मुसलमानेतर भागीदारांची यादी मागविली आहे. ह्या भागांवरील नफा हा तावेदारांच्या मालकीचा असल्यामुळें तो भागांच्या मालकांना देण्यांत येऊं नये अशी सूचना देण्यांत आलेली आहे. ता. १३ ते १५ पर्यंत दोन्ही वसाहतींची जी परिषद् झाली तीमधील निर्णयाला पाकिस्तानी पत्रक सोडून असल्यामुळें हिंद सरकार पाकिस्तानकडे ह्यासंबंधीं तक्रार करणार आहे, असें समजतें.

**ऐनजिनसी देवाण-घेवाण करण्याची सूचना**—इंटरनॅशनल कॉटन ॲडव्हायजरी कमिटीच्या अधिवेशनाला गेलेल्या हिंदी शिष्टमंडळानें आपला अहवाल नुकताच सरकारला सादर केला. ह्या अहवालांत इजिप्त, पेरू व ब्राझिल ह्या देशांकडून लांब धाग्याचा कापूस आयात करण्यासाठीं हिंदुस्थाननें ऐनजिनसी देवाण-घेवाण करण्याचा करार करावा असें सुचविण्यांत आलें आहे. अहवालांत अशी माहिती सांगण्यांत आली आहे कीं, हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वी हिंदुस्थान कापसाची निर्यात करणाऱ्या देशांपैकीं एक प्रमुख देश होता. देशांतील सध्याच्या कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाढ करून आणि त्याची निर्यात करून अधिक परदेशी हुंडणावळ मिळवितां येईल असेंही अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे.

**यांत्रिक शेतीची प्रगति**— हिंदी शेतींत यंत्रांचा उपयोग करण्याच्या बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. गेल्या कांहीं महिन्यांत ३०० यांत्रिक नांगर आणविले गेले आणि त्यांची वाटणी प्रांतिक सरकारें व संस्थानें ह्यांच्यांत करण्यांत आली. अजून २०० यांत्रिक नांगर अमेरिका व इंग्लंडकडून मिळावयाचे आहेत. पूर्व पंजाबांतील मुसलमान निर्वासितांनीं सोडून दिलेल्या जमिनी २०० यांत्रिक नांगरांच्या साह्यानें नांगरण्यांत येणार आहेत. संयुक्त प्रांतांतील मीरत, नैनीताल आणि झांशी ह्या भागांतील विस्तीर्ण पडीक जमिनी नांगरल्या जात आहेत. त्यासाठीं १५ नांगरांचें एक ह्याप्रमाणें ३ केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. मध्य प्रांतांत ९ हजार निर्वासित आणि सेवानिवृत्त सैनिकही अशाच कामांत गुंतले आहेत.

**बडोदा संस्थानांतील निर्वासित**—बडोदा संस्थानांत आलेल्या निर्वासितांची कायमची व्यवस्था लावण्यासाठीं बडोद्याच्या महाराजांनीं ६२,७४,००० रुपये मंजूर केले आहेत. सुमारें ५ हजार निर्वासितांची सोय बिलिमोरा व नवसारी ह्या जिल्ह्यांतून करण्यांत येणार आहे.

–सर्व प्रांतांतील–
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, हमदेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २६ मे १९४८




संस्थापक

प्रो. बा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## मुंबई सरकारचें औद्योगिक धोरण

मध्यवर्ती हिंद सरकारनें आपलें औद्योगिक धोरण जाहीर केल्यानंतर प्रांतिक सरकारांनीं त्या धोरणाला अनुसरून आपलें धोरण आंखावें हें साहजिकच आहे. मुंबई सरकारनें ह्यासंबंधीं नुकतेंच एक निवेदन काढलें असून त्यांत पुढील मुख्य तत्त्वें ग्रथित करण्यांत आलेलीं आहेत. ( १ ) प्रांतांतील उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ करून धनोत्पादन वाढविणें. सर्व लोकांना कामधंदा मिळून त्यांचें रहाणीचें मान योग्य त्या पातळीवर आणणें. ( २ ) उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण कोणत्याही एकाच भागांत होऊं न देतां त्याची प्रांतभर पसरण करणें. त्यामुळें मोठ्या शहरांतील बेसुमार गर्दी कमी होऊन प्रांतांतील निरनिराळ्या भागांची समतोल औद्योगिक वृद्धि करतां येणें शक्य होईल. ( ३ ) प्रांतांतील मनुष्यबळाचा अधिक पूर्णतेनें उपयोग करून घेण्यासाठीं लहानसहान उद्योगधंदे व ग्रामोद्योग ह्यांची उभारणी करणें. त्यामुळें खेड्यांतील जनतेला जोडधंदे उपलब्ध होतील आणि आर्थिक व राजकीय सत्ता विकेंद्रित राहील. ( ४ ) उत्पादन कार्यक्षमतेनें चालविण्यासाठीं, उत्पादनाची विभागणी न्याय्य रीतीनें करण्यासाठीं आणि ग्राहकांच्या व कामगारांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवणें. ह्या उद्दिष्टांची पूर्ती होण्यासाठीं सरकारचें करविषयक धोरण आणि मजूर–मालक संबंधविषयक धोरण, ह्यांचाही विचार करून सरकार उपाययोजना करणार आहे.

खाजगी उद्योगधंद्यांना सर्वथैव मोकळीक देण्याच्या धोरणांत सरकार बदल करणार आहे. समाजाच्या आर्थिक जीवनांत प्रत्यक्ष भाग न घेण्याचें जुनें धोरण सोडून, प्रांतांतील मनुष्यबळ व धनोत्पादक सामग्री ह्यांची कांहीं एक संघटना करण्याचा सरकारचा उद्देश आहे. ह्या उद्देशाला धरून उद्योगधंद्यांच्या वाढीला उत्तेजन देणें आणि कांहीं उद्योगधंदे स्वतःच काढणें असा दुहेरी कार्यक्रम सरकारनें स्वीकारला आहे. सध्या संरक्षणाविषयक उद्योगधंदे सोडून बाकीचे उद्योगधंदे प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येतात. हें खरें असलें तरी, आयात-निर्यातीवरीलं नियंत्रणें, त्यावरील जकाती, रेल्वेचे वहातुकीचे दर, इत्यादि बाबी मध्यवर्ती सरकारच्या हातीं आहेत. ह्या बाबतींतील धोरणावर औद्योगिक विकास अवलंबून असतो हें उघडच आहे. कोणत्याही देशाचें अगर प्रांताचें औद्योगीकरण बळकट पायावर उभारावयाचें असेल तर त्यासाठीं चार गोष्टींची आवश्यकता असते. (१) कच्चा माल, ( २ ) प्रेरक-शक्ती, ( ३ ) भांडवल आणि ( ४ ) तज्ज्ञ कामगार व यंत्रज्ञ. ह्या गोष्टी विपुलतेनें मिळाव्या म्हणून सरकार भूगर्भ आणि जंगलें ह्यांची पाहणी-तपासणी करण्याचा विचार करीत आहे. खाजगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं सरकार लवकरच पुढील गोष्टी करण्यास प्रारंभ करणार आहे ( १ ) खेड्यांतून विजेचा पुरवठा करणें, ( २ ) इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना करणें आणि ( ३ ) व्यापार करणाऱ्या स्वतंत्र उत्पादक संस्था निर्माण करणें. मध्यवर्ती सरकारनें जे धंदे सरकारच्या मालकीला योग्य ठरविले आहेत, त्यांपैकीं नवीन निघणारे उद्योगधंदे सरकार स्वतःच काढण्याचा संभव आहे. मुंबई सरकारनें प्रांताच्या औद्योगिक पुनर्घटनेसंबंधीं आखलेल्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ही उद्योगवृद्धीची योजना जाहीर झालेली आहे.

## म्हैसूर संस्थान सुधारलेलें म्हणतात, तें कां ?

म्हैसूर संस्थानाला आधुनिक उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें सुधारलेलें म्हणून मानण्यांत येतें. त्याची सार्थता लक्षांत येण्यासाठीं पुढील माहिती समजणें जरूर आहे. हिंदुस्थानांतील सोन्याचें बहुतेक सर्व उत्पादन म्हैसूरच्या सोन्याच्या खाणींत होतें. चंदनाचें लांकूड फक्त म्हैसूर संस्थानांतूनच जगाला मिळूं शकतें. हिंदुस्थानांतील पहिला जल-प्रवाह निर्मित विजेचा कारखाना कावेरीवरील धरणाच्या साह्यानें १९०० सालीं उभारण्यांत आला. भद्रावती येथील लोखंडाचा कारखाना, लाकडाच्या कोळशापासून लोखंड व पोलाद तयार करणाऱ्या हिंदुस्थानांतील कारखान्यांपैकीं दुसरा मोठा कारखाना आहे. विजेच्या साह्यानें चालणाऱ्या भट्टच्या भद्रावती येथें लवकरच उभारण्यांत येणार असून त्या चालू झाल्या म्हणजे लोखंडाचें उत्पादन तिपटीनें वाढेल. आज कच्च्या रेशमाच्या उत्पादनांत म्हैसूर बाकीच्या हिंदुस्थानाच्या पुढें आहे. म्हैसूरमध्यें सिन्थेटिक अमोनिआ तयार करण्याचा हिंदुस्थानांतील पहिला कारखाना आहे. हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा साखरेचा कारखाना मंड्या येथें उभारण्यांत आला आहे. म्हैसूर संस्थानानें इतर संस्थानांच्या आधीं विद्यापीठ स्थापन केलें. म्हैसूर सरकारचा चिनीमातीच्या भांड्यांचा कारखाना पूर्वेकडील देशांत पहिल्या नंबरचा आहे, असें म्हणतात. ह्या कारखान्यांत विजेचा उपयोग करून घेण्यांत येतो. हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरी, हा विमानांचा कारखाना हिंदुस्थानांत पहिलाच आहे.

### मालवाहू व तेलवाहू आगबोटी

जगांतील वेगवेगळ्या देशांच्या मालकीच्या मालवाहू व तेलवाहू आगबोटी किती टनांच्या आहेत, ह्याची तुलनात्मक माहिती प्रसिद्ध झाली आहे. तेलाच्या सर्पणावर चालणाऱ्या आगबोटींचें प्रमाण १९३९ ते १९४७ ह्या मुदतींत ३०% चें ५३% झालें व कोळशाच्या सर्पणावर चालणाऱ्या आगबोटींचें प्रमाण ४५% वरून २६% वर उतरलें.

| मालकी देश | टन ( १,००० ) | % |
|---|---|---|
| अमेरिका | ३२,४२,३१,९९ | ३८·८२ |
| ग्रेट ब्रिटन | १७,८४,७८,९७ | २१·३७ |
| नॉर्वे | ३,७६,०९,४१ | ४·५० |
| नेदरलंडस | २,४३,६३,८५ | २·९१ |
| फ्रान्स | २,३१,४८,९८ | २·७७ |
| रशिया | २,१५,६९,८७ | २·५८ |
| जागतिक बेरीज | ८३,५१,३७,७२ | १००·०० |

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

श्री. भाऊसाहेब देशपांडे ह्यांनीं वरील बँक ३१ जुलै १९३७ रोजीं मुंबई येथें स्थापन केली. शेड्यूल्ड बँक होणारी ही पहिलीच महाराष्ट्रीय बँक. तिच्या आतां मुंबई, दिल्ली, पंजाब, मुंबई प्रांत, दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें, मध्यप्रांत, वऱ्हाड, इत्यादि ठिकाणीं मिळून ४७ शाखा आहेत. गेल्या चार वर्षांत तिचें खेळतें भांडवल १ कोटी, ८५ लक्ष रुपयांवरून ३ कोटी, ५० लक्ष रुपयांवर गेलें आहे आणि रिझर्व्हची रकम ५२ हजार रुपयांची २ लक्ष, ८ हजार रु. झाली आहे. गेल्या वर्षांतील बिकट परिस्थितींतहि बँकेचा व्यवहार वाढला आहे. बँकेच्या १९४७ अखेरच्या हिशेबावरील डायरेक्टरांचा अहवाल आमचेकडे आला आहे. त्यांत बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख बाबींची माहिती नेहमींप्रमाणें देण्यांत आलेली आहे. आपल्या बँकेच्या कारभाराची भागीदारांना विस्तारानें माहिती देऊन त्यांना अगत्यपूर्वक विश्वासांत घेण्याचें श्री. देशपांडे ह्यांचें प्रारंभापासूनचेंच धोरण आहे.

बँकेच्या डायरेक्टरांचे रिपोर्टांत, सरकारी रोख्यांच्या घसाऱ्याची जी चर्चा केलेली आहे, तिचेकडे वाचकांचें विशेष लक्ष वेधणें आवश्यक आहे. रोख्यांच्या बाजारी किंमती उतरल्या, म्हणून त्यांची सरकारकडून ठराविक दिवशीं निश्चितपणें मिळावयाची दर्शनी किंमत कमी होऊं शकत नाहीं, ही गोष्ट दृष्टीआड करून भागणार नाहीं. ९८ रुपये देऊन १०० रु. दर्शनी किंमतीचा रोखा घेतला व त्याची आज किंमत ९७ रुपयांवर आली, म्हणजे १ रु. घसारा निर्माण होतो, हें हिशेबाचे दृष्टीनें खरें आहे. परंतु ह्याच रोख्याचे १०० रुपये सरकारकडून पांच-सात वर्षांनीं मिळावयाचे असतील, तर १ रु. नुकसानी ऐवजी २ रु. वाढावाच पदरीं पडेल. अशा तऱ्हेनें ५४,००० रुपये वाढावा देणारे ४७ लक्ष रुपयांचे रोखे न्यू सिटिझनचे दप्तरांत आहेत. तेव्हां, आज घसारा दिसला, तरी बँकेस मोठ्या रकमांचे रोखे नेहमीच पदरीं ठेवावे लागत असल्याकारणानें त्यामुळें अंतिम भक्कमपणास बाध येण्याचें कारण नाहीं. कांहीं रोखे दर्शनी किंमतीपेक्षां अधिक दरानेंहि घेतलेले असणार; त्या दोन किंमतीमधील तफावतीची तरतूद रोख्यांच्या मुदलाच्या परतफेडीच्या तारखेपूर्वी झाली म्हणजे पुरें असतें. न्यू सिटिझननें ५० हजार रुपये चालू वर्षी इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत टाकले आहेत, हें त्या दृष्टीनेंच असलें पाहिजे. अशा रीतीनें, एकीकडे घसाऱ्याची तरतूद होत आहे व दुसरीकडे वाढावा हातीं येण्याची निश्चिती आहे. बँकेच्या मालमत्तेची किंमत ताळेबंदांत ३,३५,८२७ रुपये दिसत असली, तरी आर्किटेक्टांच्या रिपोर्टाप्रमाणें ती किमान ९०,००० रुपयांनीं वाढलेली आहे. परंतु, ही वाढ अर्थातच हिशेबामध्यें घेतलेली नाहीं. अनुकूल बाबींचा फायदा घ्यावयाचा नाहीं; परंतु एकादी बाब थोडी जरी प्रतिकूल वाटली तरी तिची पूर्ण व्यवस्था करावयाची, हा बँकिंगच्या धंद्याचा शिरस्ता आहे. त्यामुळेंच, ताळेबंदांत दिसणाऱ्या परिस्थितीपेक्षां बँकांची खरी परिस्थिति पुष्कळच अधिक भक्कम असूं शकते. चांगल्या हिंदी बँका प्रतिष्ठित ब्रिटिश बँकांचें ह्या बाबतींत अनुकरण करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. रोख्यांच्या पडलेल्या किंमती राजकीय व आर्थिक परिस्थिति सुधारल्यावर पुनः चढल्या, तरी त्यांच्या घसाऱ्याची केलेली तरतूद ही कांहीं वाया जाणार नाहीं. भागीदारांच्याच मालकीचा तो पैसा रहाणार आहे. घसाऱ्याच्या तरतुदीची व्यवस्था करण्यांत व ऑर्डिनरी शेअरवरील डिव्हिडंड तहकूब ठेवण्यांत न्यू सिटिझननें आपल्या भागीदारांचें उत्कृष्टपणें हितच पाहिलें आहे आणि हें डिव्हिडंड अधिक अनुकूल वेळीं देऊन टाकण्याचें आश्वासनहि बोर्डानें दिलें आहे.

श्री. भाऊसाहेब देशपांडे ह्यांनीं अत्यंत आपुलकीनें व कळकळीनें बँकेची जोपासना केली आहे. त्यांची महाराष्ट्रीय व्यापार व उद्योगधंद्यांबाबत तळमळ सुप्रसिद्धच आहे. मुंबई येथें मोठी महाराष्ट्रीय बँक स्थापण्याच्या उपक्रमास त्यांनीं जनतेचा पाठिंबा मिळवून बँकेस आजचा दर्जा प्राप्त करून दिला. बँकेची वाढ अखंड होत राहो, असें आम्ही इच्छितों.

---

### घरांच्या टंचाईबद्दल सरकारचें धोरण

मुंबई आणि मुंबईचीं उपनगरें, त्याचप्रमाणें अहमदाबाद, सोलापूर, हुबळी व पुणें ह्या मोठ्या शहरांतून सध्या रहात्या जागेची अत्यंत चणचण आहे. ही चणचण अंशतः दूर करण्याच्या दृष्टीनें मुंबई सरकारनें सहकारी-गृह-संस्था आणि नागरिक ह्यांना मदत करण्यासाठी कांहीं नियम केले आहेत. त्यांचा गोषवारा पुढीलप्रमाणें आहे. घरें बांधण्यासाठी जमीन पाहिजे असणारांनीं आपआपल्या भागाच्या कलेक्टरकडे त्यासाठी अर्ज करावे. ह्या अर्जांत जमिनीचा नकाशा, सर्वे नंबर, क्षेत्रफळ, जागेची मालकी व किती माणसांकरतां घर बांधावयाचें आहे इत्यादि माहिती असावी. सहकारी गृहसंस्थांनीं आपल्या योजना स्वतंत्रपणें आंखल्या तरी चालतील; परंतु, त्यांच्या योजना सरकारच्या सल्लागार सर्व्हेअरनें मंजूर केलेल्या असल्या पाहिजेत. एकाच योजनेंत दोन संस्थांचा संबंध येत असेल तर ती सरकारच्या सल्लागारानेंच तयार केलेली असावी.

इमारतीला लागणाऱ्या सामानासाठीं अर्ज मुंबईच्या असिस्टंट हौसिंग कमिशनरकडे करावे. ज्या सहकारी संस्था दोन खोल्या व स्वयंपाकघर अगर ह्यापेक्षा कमी अशा रहात्या जागा बांधणार असतील त्यांना ३ टक्के अगर सरकारी कर्जापेक्षा ½ टक्के कमी, ह्यापैकीं जो अधिक दर असेल त्या दरानें कर्ज देण्यांत येईल. सहकारी संस्था जर ग्राहक सभासदांचीच असेल तर तिला जमीन व इमारत ह्यांच्या किंमतीच्या ७५ टक्के कर्ज देण्यांत येईल. इतर सहकारी संस्थांना ६० टक्के देण्यांत येईल. ज्या सहकारी संस्था अधिक उच्च दर्जाच्या जागा बांधतील त्यांना जमिनीच्या व इमारतीच्या किंमतीच्या ५० टक्के कर्ज, बँकेच्या व्याजाच्या दरापेक्षा ½ टक्के कमी ह्या व्याजाच्या दरानें देण्यांत येईल. मात्र बँकेचा व्याजाचा दर सरकारनें त्यापूर्वी कर्ज काढलें त्यापेक्षां कमी असता कामा नये. हीं कर्जे फेडण्याची मुदत ३५ वर्षांची राहील. कर्जाचे अर्ज त्या त्या भागांतील डेप्युटी रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांचेकडे सोसायटीच्या असिस्टंट रजिस्ट्रारमार्फत करावयाचे आहेत. सर्व अर्जांबरोबर इमारतींचे नकाशे, तिला लागणाऱ्या खर्चाचा अंदाज आणि संस्थेच्या जमिनीच्या मालकी हक्काबद्दल कलेक्टरचें सर्टिफिकेट हीं असलीं पाहिजेत. ही जमीन कर्जाला तारण म्हणून राहील. कर्ज एका रकमेनें देण्यांत येईल आणि फेडीचे हप्ते सोयीनें ठरविण्यांत येतील.

---

### क्षयरोगाच्या उपचाराच्या सोयींत वाढ

सध्यां मुंबई प्रांतांतील सर्व इस्पितळांत मिळून १,२६१ क्षयरोग्यांपुरत्या खाटा आहेत. मुंबई उपनगरांत ३०० रोग्यांच्या सोयीचीं २ इस्पितळें उघडण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. तळेगांव येथील इस्पितळांतील दातार ब्लॉकचें उद्घाटन पंतप्रधान श्री. खेर ह्यांनीं नुकतेंच केलें.

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

## डायरेक्टरांच्या आढाव्यांतील महत्त्वाच्या बाबी

( १ ) नऊ महिन्यांचा ताळेबंद–न्यू सिटिझननें आपलें हिशोबाचें वर्ष ३१ मार्च अखेरचें बदलून ३१ डिसेंबर अखेरचें केलें आहे. मागील वर्षींच बोर्डानें हा बदल करण्याचें ठरविलें होतें आणि आगामी बँकिंग कायद्यानेंहि तें सर्व बँकांस आवश्यक करण्याचें योजिलें आहे. सहाजीकच, प्रस्तुत ताळेबंद ९ महिन्यांचा आहे.

( २ ) अखंड प्रगति–देशांतील राजकीय व आर्थिक स्थित्यंतरांस यशस्वीपणें तोंड देऊन बँकेनें आपली प्रगति कायम राखली आहे. बँकेच्या दिल्ली व गुरगांव ( पंजाब ) येथील शाखांस १५ ऑगस्ट १९४७ नंतरच्या बंडाळीमुळें झळ सोसावी लागली, परंतु अधिकारी वर्गाच्या कार्यक्षमतेमुळें प्रगतींत खंड पडला नाहीं.

( ३ ) व्यवहारांत वाढ–बँकेच्या ताळेबंदाची बेरीज ३ कोटी, ६२ लक्ष रुपये झाली आहे. म्हणजे, अहवालाचे वर्षी त्यांत बरीच भर पडली आहे. बँकेच्या शाखांच्या संख्येंत वाढ करण्यांत आली नाहीं; झालेली प्रगति आणखी दृढमूल करण्याचें डायरेक्टरांचें धोरण आहे. त्यामुळें बँकेच्या व्यवहारांत वाढ होत आहे.

( ४ ) पैशाचा तरलेपणा–बँकेची जिंदगी शक्य तेवढी तरती, किफायतशीरपणास थोडा बाध आला तरी, ठेवण्याचें डायरेक्टरांचें धोरण त्यांच्या अहवालांत सालोसाल विशद करण्यांत आलेलेंच आहे. हेंच धोरण अहवालाचे वर्षीहि अमलांत होतें. “ जनता व बँक ह्या दोघांच्याहि दृष्टीनें भक्कम पाया हा अत्यंत महत्त्वाचा आहे ” असें बोर्डाचें मत आहे.

( ५ ) उत्पन्नाच्या बाबी—बँकेस व्याज, कमिशन, ब्रोकरेज, इत्यादींचे रूपानें मिळणारें उत्पन्न वाढत्या प्रमाणांत आहे. नऊ महिन्यांत बँकेनें ८½ लक्ष रु. व्याज मिळविलें आणि कमिशन वगैरेचें उत्पन्न १ लक्ष, ६६ हजार रु. झालें. बँकेच्या शाखावाढीच्या धोरणाचा हा एक महत्त्वाचा परिणाम आहे. बँकेनें नोकरवर्गासाठी बिऱ्हाडें बांधून दिलीं, त्यांचा फायदा नोकर वर्गास मिळत आहे. बँकेच्या इमारतींतील गुंतवणुकीवर ३¾% व्याज सुटत आहे. इमारतींची आजची बाजारी किंमत ताळेबंदांतील किंमतीपेक्षा ९०,००० रुपयांनीं जास्त आहे, असा बँकेच्या चार्टर्ड आर्किटेक्टांचा अभिप्राय आहे.

( ६ ) काटकसरीचें धोरण—व्यवस्था खर्च वाढत आहे, परंतु नोकर वर्गाच्या पगारांत काटकसर करणें बोर्डास केव्हांहि श्रेयस्कर वाटत नाहीं. परंतु, बोर्डाच्या सभांच्या फी कमी करून, कांहीं वरिष्ठ नोकरांस आपण होऊन कांहीं वेतन कमी घेण्यास विनंति करून, अनावश्यक नोकर कमी करून आणि सध्याच्या किमान वेतनास कात्री न लावतां शक्य ती काटकसर करून बोर्डानें खर्चाचा आकडा कमी करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. ह्या धोरणाचा परिणाम पुढील ताळेबंदांत दिसून येईल.

( ७ ) नफा वाटणी—अहवालाचे वर्षी बँकेस ७३,८०० रु. नफा झाला. त्यांत मागील शिल्लकी नफा मिळवला म्हणजे १,१७,९८१ रु. एकूण नफा होतो. त्यांतून ५०,००० रु. इनव्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंडाकडे वर्ग केले आणि ४,००० रु. नोकरवर्गाच्या प्रॉव्हिडंट फंड रिझर्व्हमध्यें टाकले म्हणजे नफा वाटणीसाठीं व इनकम टॅक्स देण्यासाठी ६३,९८१ रु. उरतात. प्रेफरन्स भागांस ५% डिव्हिडंड देण्यास १५,००० रु. लागतात व ४८,९८१ रु. उरतात त्यांतून इनकम टॅक्स भागवून शिल्लक पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल.

( ८ ) डिव्हिडंडबाबत आश्वासन—ऑर्डिनरी भागांस डिव्हिडंड देण्यासाठी २३,००० रु. पुरले असते. परंतु बँक ह्या ‘संस्थे’च्या हितास प्राधान्य देऊन हें डिव्हिडंड तूर्त जाहीर केलेलें नाहीं. बँकेनें ऑर्डिनरी भागीदारांस पहिल्या चार वर्षांकरतां ३% डिव्हिडंड ७ व्या, ८ व्या व ९ व्या वर्षी आपण होऊन, तें देण्याचें बंधन नसतांहि, दिलें आणि ५ व्या ते ९ व्या वर्षअखेर त्यांस ५% डिव्हिडंड दिलें. सर्व गोष्टींचा व्यापक विचार करून, बँकेस येत्या कांहीं वर्षांत शक्यता प्राप्त होतांच, शिलकी डिव्हिडंड ५% दरानें देण्याचें आश्वासन बोर्डानें ऑर्डिनरी भागीदारांस दिलेलें आहे. म्हणजे, यंदा डिव्हिडंड मिळलें नाहीं, तरी ऑर्डिनरी भागीदारांचें नुकसान होऊं दिलें जाणार नाहीं. १९४७ सालीं कित्येक चांगल्या बँकांनीं आपली मजबुती वाढविण्याचे दृष्टीनें डिव्हिडंड दिलेलें नाहीं. न्यु सिटिझनची एकूण गंगाजळी आतां २,०८,००० रुपयांवर गेली आहे; म्हणजे तिची गंगाजळीची रकम एकूण वसूल भांडवलाच्या २०% पेक्षा अधिक आहे.

( ९ ) घसारा व वाढावा ह्यांची चर्चा—सरकारी रोख्यांची बाजारी किंमत त्यांस पडलेल्या किंमतीपेक्षा खाली गेली, म्हणजे घसारा निर्माण होतो. तथापि, ह्या घसाऱ्याचें खरें स्वरूप ध्यानांत घेतलें पाहिजे. बँकेनें जे रोखे त्यांच्या दर्शनी किंमतीपेक्षा कमी दरानें घेतले, त्यांचे कालांतरानें, ठराविक वर्षी, दर्शनी किंमतीइतके पैसे निश्चित मिळावयाचे आहेत. हे रोखे बँक धारण करीत राहाणारच; म्हणजे त्यांत घसारा अनुभवास येणारच नाहीं; उलट वाढावाच मिळेल. बँकेजवळ असे ४७ लक्ष रुपयांचे रोखे आहेत आणि त्यांचे पोटीं बँकेस ५४ हजार रु. वाढावा मिळणार आहे. घसाऱ्याचा तात्विक दृष्ट्या विचार केला, तर इमारतीच्या किंमतीमधील ९० हजारांची वाढहि दृष्टीआड करतां येणार नाहीं.

### सहकारी कानूंची दुरुस्ती

मुंबई सहकारी कायद्याच्या ७१ व्या कलमानें दिलेल्या अधिकारान्वयें मुंबई सरकारनें सहकारी कानूंपैकी ८ व्या कानूचे जागीं नवे कानू घालण्याचें ठरविलें आणि त्या बाबत लोकांनीं १५ एप्रिलपर्यंत हरकती पाठवाव्यात, असें जाहिर केलें. (पहा: अर्थ, ता. १४-४-४८) आतां ह्या दुरुस्त्या कायम करून मुंबई सरकारच्या गॅझेटांत त्या प्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. नियमित जबाबदारीच्या सोसायटींनें व प्रांतिक सहकारी बँकेनें द्यावयाच्या कर्जावर निर्बंध, ह्याविषयक त्या दुरुस्त्या आहेत.


## कूळ कायदा

आवृत्ति ३ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.

| | |
|---|---|
| मुंबई सावकारी कायदा | किं. ३॥ रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा | कापडी किं. ४॥ रु. |
| | कागदी किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विकीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,००१
जमा झालेलें भांडवल रु. ७,११,८९०
खेळतें भांडवल रु. ६६,५०,०००

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
“ बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. ”

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलूएल्. बी.,
मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टके
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## जमात आणि सामाजिक प्रश्न

### ग्रामीण न्यायमंडळ व सामाजिक प्रश्न

(तारीख ११ मे १९४८ रोजीं मुंबई नभोवाणीवर श्री. यशवंत दत्तात्रय खोले पुणें यांनीं केलेलें भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांच्या कृपेनें उद्धृत केलें आहे.)

जमात आणि सामाजिक प्रश्न व मुख्यतः ग्रामीण न्यायदान मंडळ आणि सामाजिक प्रश्न याबद्दल चर्चा करावयाची आहे.

**प्राचीन खेडीं**

प्राचीन काळीं समाज विखुरलेला असे व निरनिराळ्या ठिकाणीं हा समाज वस्ती करून रहात असे. खेडेगांवाचें अस्तित्व फार प्राचीन काळापासून आहे असें दिसतें. प्राचीन काळीं शेती हा प्रधान व्यवसाय असा समजला जात असे व या व्यवसायास योग्य अशीं वस्तीचीं ठिकाणें शोधून काढून तेथें वस्तीस योग्य अशीं साधनें निर्माण करण्यांत आलीं. खेडेगांवाचे अस्तित्वाचा शोध वेदकाळापासून लागतो. परंतु तो त्यापूर्वींही असणें शक्य आहे असें दिसतें. आपणांस असें दिसून येतें कीं, आपल्या देशांत हिंद संस्थानें मिळून बहुसंख्य अशी खेडेगांवाची संख्या जास्त आहे व सुमारें ८५ टक्के वस्ती ही खेडेगांवांतून विखुरलेली आहे.

खेडेगांवें हीं स्वायत्त अशीं समजलीं जात असत. फिरत्या टोळ्या ज्यावेळीं स्वास्थ्य व कायमची रहाणी या दृष्टीनें स्थाईक होण्याची तयारी दाखवूं लागले त्यावेळीं आपलें जीवन सुधारण्याच्या प्रश्नाबरोबरच इतर प्रश्नांचा विचार करूं लागल्या. सर्वसाधारण मनुष्यस्वभाव व स्वयंनिर्मित समाज यांचे परस्परांचे संबंध जसे वारंवार येऊं लागले तसतसे आपापसांतील तंटे, गुन्ह्यास आळा घालणें व सर्वसाधारणपणें समाज सुखी कसा होईल यासंबंधीं विचार सुरू झाला. समाजघटकांची मुख्य दक्षता आपली जमीन चांगली कसून उत्पादन वाढविणें व जर राज्यछत्राखाली राहाण्याची स्थिति आली तर राजास उत्पन्नांतील योग्य भाग संरक्षणासाठीं देण्यापर्यन्त स्थिति आली.

प्राचीन काळीं खेडेगांवासाठीं निश्चित घटना अगर कायदे नसत. खेडेगांवाचा एक पुढारी असे त्यास पाटील असें संबोधण्यांत येत असे. पाटील हा गांवचा मुख्य कार्यकारी अधिकारी असे. पाटलाचें मुख्य काम म्हणजे शेतसारा वसूल करणें व गांवकरी लोकांचे सहायानें गांवाचे परचक्रापासून संरक्षण करणें हें होय. पाटलाची सहसा पूर्वकालीं निवड होत नसे. परंतु ते वंशपरंपरा त्या जागेवर असत. गांवाचे पाटलाकडे तंटे मोडण्याचेंही काम असे. पाटलाकडे याशिवाय दुसरीं कामें असत. गांवांतील विहीर दुरुस्तीच्या कामावर देखरेख करणें. सहकारी पद्धतीनें काम करणारी संस्था अस्तित्वांत आणणें. राजदरबारीं गांवाचे प्रतिनिधि म्हणून समारंभास गांवकऱ्यांचे खर्चानें हजर राहणें. पश्चिम हिंदुस्थानांत गांवकऱ्यांचेमध्यें पाटलांचें वजन फार असे. पाटील हा गांवकऱ्यांचें परचक्रापासून, चोरांपासून व अधिकाऱ्यांपासून संरक्षण करणारा, प्रेमळ मातापितरांच्या योग्यतेचा असा समजला जात असे. राज्यकर्ते जरी बदलले तरी गांवचें पाटील वतन अद्याप कायम आहे. यावरून अद्याप त्यांचें राज्यकारभाराचे दृष्टीनें किती महत्त्व आहे हे दिसून येतें. ही गोष्ट खरी कीं पाटलांचें पूर्वींचे वजन आतां कमी झालें आणि याचें कारण म्हणजे त्यांचे पूर्वींचे अधिकार व सत्ता कमी झाली. त्यांजकडे पूर्वींच्या कामापैकी म्हणजे न्यायादानाचें काम तसेंच लोकांच्या संरक्षणाचें काम राहिलेलें नाहीं. याशिवाय खेडेगांवांत पाटलास मदतीसाठी कुलकर्णी, संरक्षणासाठी रामोशी व ग्रामोपाध्ये असत. (अपूर्ण)

**सह्याद्रि विमा खबर: एक उपयुक्त उपक्रम**—सह्याद्रि विमा कंपनी लि., नासिकनें सह्याद्रि विमा खबर नांवाची एक छोटीशी पत्रिका दरमहा ७ तारखेस प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. आतांपर्यंत पत्रिकेचे ७ अंक प्रसिद्ध झाले आहेत. विमा खबरमध्यें विमा प्रतिनिधींना व विमेदारांना मार्गदर्शक व उपयुक्त माहिती येत असते. विम्याच्या प्रसाराचा कंपनीचा हा उपक्रम स्तुत्य आहे. पाश्चात्य देशांतील कित्येक विमा कंपन्यांचे प्रमाणें अशा प्रकारची पत्रिका प्रसिद्ध करण्यास प्रारंभ करून 'सह्याद्रि'नें आपली प्रगतिप्रियता स्पष्ट केली आहे. ह्या उपक्रमामुळें 'सह्याद्रि'च्याच नव्हे तर सर्वच विमेदारांचें व पर्यायानें जनतेचें हित साधणार आहे. अनेक विमा कंपन्यांनीं अशाच एकाद्या पद्धतीनें विम्याची लोकप्रियता वाढविण्यास हातभार लावला, तर हिंदी विमा व्यवसायाची प्रगति होण्यास फार मोठें सहाय होणार आहे. (वार्षिक वर्गणी ८ आणे; प्रतीस १ आणा. प्रकाशक: गो. म. सौंदणकर, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, सह्याद्रि विमा कं. लि., नासिक)

**मुंबईकरांना दुधाच्या पावडरीचाच चहा मिळणार**—मुंबई शहरांतील हॉटेलांना चहा-कॉफी करण्यासाठी ताजें दूध वापरण्याची मनाई आहे. दुधाची पावडर त्यासाठी वापरणें भाग पडतें. ह्या हॉटेलांना दररोज ८०० मण दूध लागतें व त्याकरितां ६,५०० म्हशी हव्यात; परंतु म्हशी दुर्मिळ आहेत व त्या मुंबईस आणण्याची वहातुकीची अडचण आहे. त्याचप्रमाणें कडबा गवत व अंबोण ह्यांचाहि तुटवडा आहे. अशा परिस्थितींत हॉटेलांना ताजें दूध वापरण्यास परवानगी दिली तर दुधाचे भाव कडाडतील व भेसळ दुधाचें प्रमाणहि वाढेल. दुधाची पावडर आयात करावी लागते, तिचा पुरवठा पूर्ववत् लवकरच होऊं लागेल अशी अपेक्षा आहे.

**टॅक्सी मालकांच्या काळ्या बाजारावर तोडगा**—मुंबईमधील कित्येक टॅक्सीमालक टॅक्सीच्या वाट्यास येणारें ९० गॅलन पेट्रोल काळ्या बाजारांत १५ रु. गॅलन ह्या दरानें विकतात; टॅक्सीचा धंदा करण्यापेक्षा हा मार्ग त्यांस अधिक किफायतशीर वाटतो. ह्या गोष्टीस आळा घालण्यासाठी मुंबई सरकारनें त्यांच्या पेट्रोलच्या टाक्यांस सिलें लावण्याची योजना केली आहे.

**इंग्रजी शाळांच्या फीमध्यें वाढ**—ह्यापुढें मुंबई प्रांतांतील इंग्रजी शाळांची किमान फी खालीलप्रमाणें रहाणार आहे.—

| | सर्वांत खालची यत्ता | सर्वांत वरची यत्ता |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| (अ) मुंबई शहर व उपनगरें | ५ | ८ |
| (ब) अहमदाबाद, पुणें, सुरत, सोलापूर व हुबळी | ४ | ७ |
| (क) इतर ठिकाणें | ३ | ५ |

**लोकल बोर्डांना ग्रँट**—जिल्हा लोकल बोर्डांना आपली आर्थिक अडचण दूर करता यावी, ह्यासाठी त्यांना त्यांच्या पूर्वींच्या वर्षांतील जमीन महसुलाच्या वसुलीच्या १५% इतकी रकम ग्रँट देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. मात्र, त्यांनीं आपला लोकल सेस फंड रुपयांत २ आणे केला पाहिजे.

**भोर स्टेट बँकेची पुणें शहर शाखा**

५१५, बुधवार पेठ (जुनी तपकीर गल्ली)

दि भोर स्टेट बँक लि. च्या पुणें येथील शाखेचें उद्घाटन शनिवार, ता. २९ मे रोजीं भोरचे राजेसाहेब सर आर. एस. पंतसचिव, ह्यांचे हस्तें होणार आहे.

## कांहीं औद्योगिक बातम्या

(पॅरेमाउंट प. सिंडिकेट मार्फत)

स्वतंत्र भारतांत देशी भाषांचें स्थान लक्षांत घेऊन वर्धा येथील कॉमर्स कॉलेज हिंदी व मराठी लघुलेखन तसेंच टंक लेखनाचे वर्ग जुलै १९४८ पासून चालू करणार आहे.

ग्लुकोज व स्टार्च यांचें उत्पादन करण्यासाठीं "ग्लुकोज अँन्ड फूड्स लि." ९ आग्रा रोड, कुर्ला, नांवाची १५ लक्ष रुपये भांडवलाची कंपनी स्थापन झाली आहे. मेसर्स कांदीकर, नाखरे अँन्ड सन्स हे कंपनीचे मॅनेजिंग एजन्टस् आहेत.

दि डेक्कन सिमेंट प्रॉडक्टस् कंपनीची सांगली मारब्लो टाईलसची नवीन शाखा सुरू करण्यांत आली आहे.

विजय इंडस्ट्रीज लि. कोल्हापूर यांच्या कारखान्याचें उद्घाटन झालें असून कारखान्यांत सायकल स्पोयर्स, तीन चाकी सायकली, वगैरे मालाचें उत्पादन होणार आहे.

श्री गणेश ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लि. चळे, पंढरपूर, ही कंपनी गूळ, साखर वगैरे शेती मालाचें उत्पादन करण्यासाठी स्थापन झाली असून कंपनीचें आतांपर्यंत रु. १,७५,००० भांडवल खपलें आहे. गूळ तयार करण्याची यंत्रसामुग्री आली आहे; तसेंच ताब्यांत आलेल्या २०० एकर जमिनींत लवकरच उसाची लागवड होणार आहे.

सुंदर सिरॅमिक्स लि., बेळगांव, यांच्या लोंढा येथील कारखान्याचें उद्घाटन उद्योगमंत्री ना. तपासे यांच्या हस्तें झालें.

---

## उद्बोधक उद्गार

"हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्या देशांचे दरम्यान कापसाचा व्यापार खुल्या रीतीनें होणें अवश्य आहे. हिंदुस्थानची फाळणी झाल्यामुळें सिंध आणि पश्चिम पंजाबसारखे कापूस पिकविणारे मोठे प्रदेश हिंदुस्थानच्या हातांतून गेले. पाकिस्ताननें आपला कापूस परदेशीं पाठविण्यास प्रारंभ केल्यामुळें हिंदुस्थानला ह्या वर्षी फक्त ४ लाख गांठींच कापूस पाकिस्तानकडून मिळूं शकेल. युद्धकालीं हिंदुस्थानांत अधिक धान्य पिकविण्याची मोहीम सुरू करण्यांत आली; त्यामुळें कापसाच्या लागवडीचें क्षेत्र कमी झालें. युद्धकाळाचा दुसरा परिणाम म्हणजे, इंग्लंड व ऑस्ट्रेलिआ सोडून बाकीची हिंदुस्थानची कापसाची बाजारपेठ गेली. १९४८ च्या शेवटीं जगांत फक्त सहा महिने पुरेल येवढाच कापसाचा सांठा शिल्लक राहील.":— इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचे उपाध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., ह्यांचें मुंबई येथील भाषण.

---

## १०० रुपयांखालील उत्पन्नाच्या कुटुंबांची धान्याची सोय

ज्या शहरांतून धान्याच्या किंमतीवरील नियंत्रण चालू नाहीं, अशा ठिकाणच्या गरीब नागरिकांस योग्य दरानें धान्य मिळावें, ह्यासाठी मुंबई सरकारनें योग्य दरानें धान्य देणारीं दुकानें उघडण्याची योजना केली आहे. ज्यांना खुल्या बाजारांत धान्य खरीदणें परवडतें, अशांना (१०० रु. वरील दरमहा प्राप्तीचे लोक, इनकमटॅक्स देणारे, नोंदलेले विक्री-करास पात्र दुकानदार, जमीनदार) ह्या दुकानांचा फायदा घेतां येणार नाहीं. ज्याला ह्या दुकानांत धान्य घ्यावयाचें असेल, त्यानें आपल्या सर्व कुटुंबीयांचें मिळून मासिक उत्पन्न १०० रुपयांवर नाहीं, असें शपथपूर्वक आपल्या अर्जांत लिहिलें पाहिजे. सहकारी सोसायट्या, म्युनिसिपल नोकरवर्ग, सरकारी नोकरवर्ग, गिरणी कामगार, अशा गटांना दुकानांसाठी प्राधान्य मिळेल. तांदूळ व गहूं ह्यांचें रेशनमधील प्रमाण २०% पेक्षां जास्त रहाणार नाहीं आणि रेशनचें इतर धान्य घेतल्यासेरीज तांदूळ व गहूं मिळणार नाहीं.


—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

### दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्टयें—

(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स तात्डतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर



### दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,५४,३५० रु. |
| भरलेलें भांडवल | ८८,००० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०७,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिश: भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक—हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/- चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/- (रु. ५/- प्रिमीयम् म्हणून व रु. २०/- अर्जासोबतचे) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/- ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/- चा. एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यामधील अंतर ३ महिन्याचेपेक्षा कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्र. रा. धनंजय वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.